# Regional Marathi Text Bulletin, Chatrapati Sambhajinagar
# Date – 13 March 2024
# Time 7.10 AM to 7.20 AM
# Language Marathi
# **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
# **प्रादेशिक बातम्या**
# **दिनांक १३ मार्च २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

- भारतीय रेल्वेमध्ये गेल्या दहा वर्षांत सर्वसमावेशक परिवर्तन–पंतप्रधानांचं प्रतिपादन
- लातूरचा मराठवाडा रेल्वे बोगी कारखाना तसंच जालन्याच्या गतीशक्ती टर्मिनलचं लोकार्पण
- सामाजिक न्याय विभागाचे राज्यस्तरीय पुरस्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रदान
- छत्रपती संभाजीनगर इथं आज स्वनिधी से समृद्धी मेळाव्याचं आयोजन

आणि

- खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत कोल्हापूर संघाला सर्वसाधारण विजेतेपद

****

भारतीय रेल्वेमध्ये गेल्या दहा वर्षांत सर्वसमावेशक परिवर्तन झालं असून, रेल्वेचा विकास हा सरकारच्या प्रमुख प्राधान्यांपैकी एक असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशभरातल्या सुमारे ८५ हजार कोटी रुपयांच्या विविध रेल्वे उपक्रमांची पायाभरणी आणि लोकार्पण काल पंतप्रधानांच्या हस्ते काल दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. या प्रकल्पांमध्ये लातूर इथल्या मराठवाडा रेल्वे बोगी कारखाना तसंच जालन्यातल्या 'गती शक्ती कार्गो टर्मिनल'सह, १५० एक स्थानक एक उत्पादन दुकानं, १८ नवीन रेल्वेमार्ग, बडनेरा इथली वॅगन दुरूस्ती कार्यशाळा, पुणे इथली वंदे भारत बोगी देखभाल दुरुस्ती कार्यशाळा, पाच जनऔषधी केंद्रं, आणि चार रेल कोच रेस्टॉरंट आदी ५०६ प्रकल्पांचा समावेश आहे. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुंबईतून

दूरदृश्यप्रणालीद्वारे तर जालना इथं केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि लातूर इथं खासदार सुधाकर शृंगारे, आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

लातूर इथल्या मराठवाडा रेल्वे बोगी कारखान्यात रेल्वे आणि मेट्रो कोचसह वंदेभारत रेल्वे कोचसुद्धा तयार होणार आहेत. जालन्यातल्या 'गती शक्ती कार्गो टर्मिनल'मुळे मराठवाड्यातल्या शेतकऱ्यांचा शेतमाल थेट विदेशात जाईल, तसंच जालन्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

दरम्यान, जालना रेल्वे स्थानकावर तयार करण्यात आलेल्या कोच देखभाल सुविधा –पिटलाईनचं आज सकाळी लोकार्पण होणार आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज, पीएम सूरज या राष्ट्रीय पोर्टलचा शुभारंभ करणार आहेत. वंचित समाजघटकांच्या विकासासाठी विविध सुविधा पुरवणारी ही योजना, देशभरातल्या ५२५ जिल्ह्यांमध्ये राबवण्यात येणार आहे. यामध्ये सुरुवातीच्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या मुंबई, नागपूर, सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, सोलापूर, अहमदनगर, हिंगोली आणि चंद्रपूर या नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे.

****

भारतीय स्टेट बँकेनं निवडणूक रोख्यांसंबंधीची सगळी माहिती काल निवडणूक आयोगाकडे सोपवली. ही माहिती आपल्या संकेतस्थळावर १५ मार्च च्या संध्याकाळपर्यंत जाहीर करण्याचे निर्देश न्यायालयानं निवडणूक आयोगालाही दिले आहेत.

****

औषधी उत्पादक कंपन्यांनी औषध वितरणासाठी आचार समिती तसंच एकसमान संहिता निश्चित करावी, असे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. या कंपन्यांनी आरोग्य सेवा क्षेत्रातल्या कोणालाही कोणत्याही प्रकारच्या भेटवस्तू देऊ नये, औषधांचे मोफत नमुने फक्त डॉक्टरांनाच दिले जावेत, असे निर्देशही सरकारनं दिले आहेत.

****

सामाजिक न्याय विभागाच्या राज्यस्तरीय पुरस्कारांचं काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते वितरण झालं. मागच्या चार वर्षातले ३९४ पुरस्कार यावेळी प्रदान

करण्यात आले. यामध्ये जालन्याचे शिवाजी गवई, छत्रपती संभाजीनगरचे धोंडिरामसिंह राजपूत, छत्रपती संभाजीनगर इथलं साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे तरुण विकास मंडळ, लातूर जिल्ह्यातली क्रांतिसूर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि लातूर इथल्याच शिवकृपा समाज सेवा मंडळ या व्यक्ती तसंच संस्थांचा समावेश आहे.

****

आदिवासी हे देशाचे खरे मालक असून, या देशातल्या जल, जंगल आणि जमिनीवर पहिला हक्क आदिवासींचा असल्याचं, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. ते काल नंदुरबार इथं भारत जोडो न्याय यात्रेत बोलत होते.

दरम्यान, आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं ४३ उमेदवारांची दुसरी यादी काल जाहीर केली. यातले १२ उमेदवार आसाममधले, मध्यप्रदेश आणि राजस्थानातले प्रत्येकी १०, गुजरात सात, उत्तराखंडमधले तीन, तर एक उमेदवार दमण आणि दीवमधला आहे.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल यवतमाळच्या राळेगाव इथं पक्षाच्या जनसंवाद मेळाव्याला संबोधित केलं, या वेळी त्यांनी केंद्र सरकार आणि भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली.

****

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगरच्या प्रादेशिक वृत्तविभागात, कंत्राटी तत्वावर अर्धवेळ वार्ताहर नियुक्त करण्यासाठी अर्ज मागवण्यात येत आहेत. शैक्षणिक पात्रता, अनुभव, वय या अर्हतेसाठी इच्छुकांनी newsonair.gov.in/vacancies या संकेतस्थळाला भेट द्यावी. इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज येत्या १४ मार्चपर्यंत सी एस एन आर एन यू डॉट ए डी एम एन ॲट जीमेल डॉट कॉम या ईमेलवर, किंवा, कार्यालय प्रमुख, प्रादेशिक वृत्त विभाग- आकाशवाणी, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर, या पत्यावर पाठवावेत.

****

नवमतदारांसाठी, मेरा पहला वोट देश के लिए, हे मतदार जागरूकता अभियान सरकारने सुरु केलं आहे. प्रसिद्ध गायिका मैथिली ठाकूर यांनी नवमतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं आज स्वनिधी से समृद्धी मेळावा होणार आहे. मराठवाडा सांस्कृतिक मंडळ मैदानावर होणाऱ्या या मेळाव्यात ३३ हजार पथ विक्रेत्यांना दहा हजार रुपयांचं कर्ज आणि परिचय पत्र वितरीत करण्यात येणार आहे.

****

केंद्रीय क्रीडा मंत्री अनुरागसिंह ठाकूर यांनी काल 'खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन' अर्थात कीर्ती योजनेची घोषणा केली. विविध क्रीडा प्रकारातल्या प्रतिभावंत तरुण खेळाडूंचा देशाच्या सगळ्या भागांतून शोध घेणं, हे या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं ठाकूर सांगितलं. शास्त्रीय चाचण्या आणि निकषांच्या आधारावर या खेळाडूंची निवड केली जाणार आहे.

****

राज्य शासनाच्या क्रीडा आणि युवक सेवा संचालनालयाच्या वतीनं, उदगीरच्या तालुका क्रीडा संकुलात पार पडलेल्या स्वर्गीय खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत, कोल्हापूर जिल्हा संघानं सर्वसाधारण विजेतेपद मिळवलं आहे. पुणे आणि सातारा संघ उपविजेतेपदाचे मानकरी ठरले. स्पर्धेतल्या सुवर्ण, रौप्य तसंच कांस्य पदकविजेत्यांना अनुक्रमे ६० हजार, ५० हजार आणि ३० हजार रुपयांची बक्षीसं देऊन गौरवण्यात आलं.

****

परभणी जिल्ह्यात मानवत इथं ॲग्रीपीव्ही संशोधन प्रकल्पाचं काल उद्घाटन करण्यात आलं. जी आय झेड ही जर्मन संस्था, सन सीड प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी आणि परभणीचं वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ यांच्यातर्फे संयुक्तपणे हा प्रकल्प राबवला जाणार आहे. ॲग्रीपीव्ही तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतजमिनीवर सौर ऊर्जा निर्मिती आणि पीक लागवड या दोन्ही बाबी शक्य होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ इन्द्र मणि यांनी यावेळी दिली.

****

बीड जिल्हा उद्योग परिषदेच्यावतीनं काल घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत ३५ उद्योग घटकांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. या कराराची एकूण किंमत ६५८ कोटी रुपये असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

लातूर शहरातल्या मालमत्ताधारकांसाठी कर थकबाकीवरचं व्याज माफ करणारी योजना महापालिकेनं जाहीर केली आहे. नागरिकांनी येत्या ३१ तारखेपूर्वी थकित

कर एकरकमी भरून ही सवलत घ्यावी, असं आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केलं आहे.

****

धाराशिव इथं काल चोरीच्या गुन्ह्यातील मुद्देमाल मूळ मालकास परत करण्यात आला. १३ गुन्ह्यातला ३१ लाखाहून अधिक रुपयांचा हा मुद्देमाल पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आला.

****

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप २०२३ अंतर्गत बीड जिल्ह्यातल्या एकूण ८६ महसूल मंडळात सोयाबीन पिकासाठी अग्रीम मंजूर करण्यात आला आहे. त्याच्या पहिल्या टप्प्यात २४१ कोटी रुपयांपैकी २३७ कोटी रुपयांचं वाटप लाभार्थींच्या खात्यात करण्यात आलं. पात्र शेतकऱ्यांनी आपलं आधारपत्र बँक खात्याशी संलग्न करुन घ्यावं, असं आवाहन जिल्हा कृषी अधिकाऱ्यांनी केलं आहे.

****

धाराशिव जिल्ह्यातल्या, नळदुर्ग - अक्कलकोट रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाचं भूमिपूजन, काल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते झालं. या रस्त्याच्या सुधारणेचं काम काही शेतक-यांनी मोबदल्याच्या कारणावरून विरोध केल्यानं प्रलंबित होतं, आमदार पाटील यांनी त्यातून मार्ग काढत, हा प्रश्न मार्गी लावला.

****

परभणी जिल्ह्यात गंगाखेड इथल्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयातला कृषी पर्यवेक्षक मोहन देशमुख याला तीन हजार रुपये लाच स्वीकारताना काल अटक करण्यात आली. अनुदानावर मंजूर झालेल्या रोटावेटर आणि ट्रॅक्टरच्या केलेल्या कामासाठी त्यानं ही लाच मागितली होती.

****

लातूर जिल्ह्याच्या निलंगा तालुक्यात काल दोन जणांचा अपघाती मृत्यू झाला, तर एक जण जखमी झाले. रस्त्यावर उभ्या उसाच्या ट्रॉलीला दुचाकी धडकून हा अपघात झाला.

परभणी जिल्ह्यात पूर्णा तालुक्यात काल अशाच एका अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला.

****

नांदेड जिल्ह्यातल्या मंगल कार्यालयाच्या मालक तसंच चालकांनी लग्नकार्य आणि शुभ प्रसंगांमध्ये मतदारांना मतदान करण्याची शपथ द्यावी, असं आवाहन नांदेडचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी केलं आहे. नांदेड जिल्ह्यात मतदानाबाबत विशेष जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे, त्याचा एक भाग म्हणून जिल्हाधिका-यांनी हे आवाहन केलं.

****